**वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,**
**कृषि नगर वसमत रोड,परभणी-४३१ ४०२ (महाराष्ट्र )**

Tel. & Fax No.(02452)229755 | Web:http:www.vnmkv.ac.in | E-mail: /reg_mau@rediffmail.com reg@mkv.ac.in

वाचा : शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२०२१/प्र.क्र.५२/सेवा-३ दिनांक २२.११.२०२१

---

"अतिप्रदान रकमेच्या अनुषंगाने विद्यापीठ
सेवेत असलेल्या कर्मचाऱ्याकडून
वचनपत्र घेण्याबाबत "

# परिपत्रक

क्रमाक:२०२१/प्र.क्र.६/परिपत्रक /आस्था-८ /4966
दिनांक : २० /१२/२०२१
28

प्रकरणी महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.५२/सेवा-३ दि.२२.११.२०२१ अन्वये गट-अ, गट-ब, (अराजपत्रीत) गट-क,व गट-ड मधील विद्यापीठातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना, त्यांच्या सेवाकाळामध्ये विविध प्रसंगी, त्यांना नियमानुसार अथवा कायद्यानुसार देय व अनुज्ञेय ठरत नसतांना (Excess of their entitlements ) , रकमांचे अतिप्रदान (Excess payment) होत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. काही प्रसंगी अतिप्रदान झाल्याचे, भविष्यात आढळून आल्यास, अशा अतिप्रदानाची रक्कम, कर्मचारी विद्यापीठास परत करेल, अशा आशयाचे वचनपत्र (Undertaking), संबंधित विद्यापीठ कर्मचाऱ्याकडून / शासनाकडून प्रतिनियुक्तीने आलेल्या अधिकारी यांचेकडून घेतले जाणे आवश्यक असतांना काही प्रसंगी वचनपत्र घेतले गेले नाही. परिणामी, अशा अतिप्रदानित रकमेची वसूली सुरु केल्यास कर्मचारी त्यास विरोध करत असल्याची बाब निदर्शनास आली आहे.

राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना, त्यांच्या सेवा काळात होणाऱ्या अतिप्रदानाची रकमांची वसुली क्षमापित (Exemption from recovery of excess payment ) करण्याबाबतच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय,औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल झालेल्या याचिका क्र.३४८०/२०२० मध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.१५.०९.२०२१ रोजी आदेश पारीत केले आहेत. मा.उच्च न्यायालयाच्या सदर आदेशातील परिच्छेद क्रमांक ९ व १० प्रमाणे नमूद करण्यात आल्याप्रमाणे लाभधारकांना कोणत्याही रकमेचे प्रदान करण्यापूर्वी, त्याला शासनाकडून कोणत्याही रकमेचे अतिप्रदान करण्यात आले आहे, असे भविष्यात निदर्शनास आल्यास अशी अतिप्रदानाची रक्कम लाभधारक, शासनास परत करण्यास बांधील राहील अशा आशयाचे लिखीत वचनपत्र (Undertaking ) घेण्यात यावे, असे शासनास आदेशित केले आहे.

उपरोक्त शासन पत्राच्या अनुषंगाने या परिपत्रकाद्वारे विद्यापीठातील सर्व कार्यालयास कळविण्यात येते की , कर्मचाऱ्याला कोणत्याही प्रसंगी जसे की, वेतननिश्चिती /वेतनवाढी / अथवा इतर कोणत्याही आर्थिक लाभाच्या / प्रदानाच्या अनुषंगाने अतिरिक्त रक्कम प्रदान झाल्याची बाब भविष्यात विद्यापीठ प्रशासनाच्या किंवा शासनाच्या निदर्शनास आल्यास अतिप्रदानित रक्कम शासनास / विद्यापीठास परत करण्याचे वचनपत्र (Undertaking ) संबंधीत अधिकारी /कर्मचाऱ्यांकडून त्यांच्या सेवाकालावधीत एकदाच घेण्यात यावे. जे कर्मचारी सद्य:स्थितीत विद्यापीठ सेवेत / शासन सेवेत आहेत

त्यांच्याकडून हे वचनपत्र या परिपत्रकाच्या दिनांकापासून ३ महिण्याच्या आत घेण्यात यावे. तथापि जे कर्मचारी सेवानिवृत्त होत आहेत त्यांच्याबाबत तात्काळ त्यांच्या सेवानिवृत्तीपूर्वी घेण्यात यावे. जे कर्मचारी विद्यापीठ /शासन सेवेत नव्याने दाखल / नियुक्त होतील त्यांच्यासंदर्भात हे वचनपत्र नियुक्तीच्या १ महिण्याच्या आत घेण्यात यावे. हे वचनपत्र विद्यापीठास / शासनास विहीत वेळेत भरुन देणे संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना बंधनकारक आहे. सदरचे वचनपत्र संबंधितांनी विहीत कालावधीत न दिल्यास त्यांचे त्यापुढील (विहीत कालावधीनंतरचे ) वेतन रोखण्याबाबत आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी. हे वचनपत्र संबंधित कर्मचारी / अधिकारी यांच्या संपूर्ण सेवा कालावधीसाठी लागू राहील याची सर्वांनी नोंद घ्यावी. तसेच हे वचनपत्र घेतल्याबाबतची नोंद सेवापुस्तकात घेण्यात यावी. तसेच सदरचे वचनपत्र सेवापुस्तकात जोडण्यात यावे. सदर कार्यप्रध्दतीचे पालन करण्याची प्राथमिक जबाबदारी आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील. सदर कार्यपध्दतीचे पालन न झाल्यास संबंधित आहरण व संवितरण अधिकारी योग्य त्या कारवाईस पात्र राहतील याची नोंद घ्यावी. (वचनपत्राचा नमूना सोबत जोडला आहे.

उक्त शासन परिपत्रक विद्यापीठास याद्वारे लागू करण्यात येत आहे.

मा.कुलगुरु महोदय यांचे मान्यतेने,

(धिरजकुमार रा.कदम )
**कुलसचिव**

प्रतिलीपी :

१. संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि),वनामकृवि,परभणी
२.संचालक संशोधन,वनामकृवि,परभणी
३.संचालक विस्तार शिक्षण,वनामकृवि,परभणी
४. नियंत्रक,वनामकृवि,परभणी
५.विद्यापीठ अभियंता,वनामकृवि,परभणी
६. सर्व अहरण व संवितरण अधिकारी,वनाकृिवि,परभणी
७. उपकुलसचिव (आस्था / साप्रवी /विद्या )वनामकृवि,परभणी

यांना देवून कळविण्यात येते की, सदरील परिपत्रक हे आपल्या अधिपत्याखालील क्षेत्रीय कार्यालयाच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.

प्रत:

१.प्रभारी अधिकारी,मध्यवर्ती संगणक केंद्र,वनामकृवि,परभणी यांना माहितीस्तव देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसारीत करावे.
२. मा.कुलगुरु यांचे खाजगी सचिव,वनामकृवि,परभणी.

वाचा : १. शासन पपिपत्रक,वित विभाग क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.५२/सेवा-३ दि.२२.११.२०२१ चे सहपत्र

२. विद्यापीठ परिपत्रक क्र.२०२१/प्र.क्र.०६/आस्था-८ दि.

## वचनपत्र

मी,श्री./श्रीमती ---------------------------- ,------------- या कार्यालयात ----------------- या पदावर कार्यरत आहे. मला विद्यापीठाकडून / शासनाकडून कोणत्याही प्रसंगी जसे की, माझी विद्यापीठ सेवेत / शासनसेवेत नव्याने नियुक्ती होईल तेंव्हा किंवा अन्य प्रकारे वेतननिश्चती/ वेतनवाढी/अथवा इतर कोणत्याही आर्थिक लाभाच्या /प्रदानाच्या अनुषंगाने माझ्या संपूर्ण सेवा कालावधीत, नियमानुसार अथवा कायद्यानुसार देय व अनुज्ञय ठरत नसतांना (Excess of entitlements) अतिरक्त रक्कम प्रदान झाल्याची बाब सद्य:स्थितीत / भविष्यात विद्यापीठाच्या / शासनाच्या निदर्शनास आली/ आल्यास,याद्वारे मी असे वचनपत्र देतो /देते की, परिगणनेतील त्रुटीमुळे अथवा कोणत्याही कारणास्तव सदर रकमेमध्ये कांही जादा रकमेचे प्रदान केल्याचे सद्य:स्थितीत /भविष्यात, विद्यापीठाच्या / शासनाच्या निदर्शनास आल्यास अशी अतिप्रदानाची रक्कम विद्यापीठास / शासनास समायोजन / रोख स्वरुपात परत करण्यास मी न चुकता बांधील आहे / राहील.

सही

ठिकाण : नाव ---------------------------

दिनांक : / / पदनाम